ePaper

## पुण्यात दोन दादांमधील तिढा सुटला?; पालकमंत्री अजित पवार यांचा चंद्रकांत पाटलांशी संपर्क



| वर्ष - 7 | अंक - 226 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 24 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

आतील पानांत

- सूर्यकुमार मालिकेतून बाहेर पडला
- गौतमी करणार लग्न!
- तुम्हाला पंतप्रधान व्हायचंय!
- २० जानेवारीला मुंबईत उपोषण

# द्रूतगती महामार्गावर 'ख्रिसमस इफेक्ट'!

## » वाहतूक कोंडीने प्रशासनाची तारांबळ : अवजड वाहने रोखली

### »वाहनचालकांना मनस्ताप

| लोणावळा | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**मुंबई एक्सप्रेस हायवेवर मोठ्या प्रमाणात वाहनांची संख्या वाढली आहे. त्यामुळे शनिवारी खंडाळा घाटात प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली. वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महामार्ग पोलिसांनी अवजड वाहनांना बंदी घातली आहे. तरी देखील मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना करावा लागला. उर्से टोलनाक्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.**



एक्स्प्रेसवेवर बोरघाटात तब्बल 10 किमी वाहनांच्या रांगा

संबंधित वृत्त पान 2 वर

वाढलेली वाहनांची संख्या लक्षात घेता महामार्ग पोलिसांनी आता पुण्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या लेनवरील वाहतूक १५-१५ मिनिटांसाठी थांबवून त्या लेनवरून पुण्याकडे जाणारी वाहतूक सोडण्यात आली. त्यामुळे मुंबईकडून पुण्याकडे येणारी वाहतूक कोंडी कमी करण्याचा प्रयत्न होता.

नाताळ सण दोन दिवसांवर आला आहे. त्यामुळे सलग सुट्ट्या आल्या आहेत. त्यामुळे पुणे - मुंबई द्रुतगती महामार्गावर चारचाकी वाहनांच्या संख्येत मोठ्या संख्येने वाढ होते. त्यामुळे आज शनिवार आणि रविवार तसेच सोमवारी सकाळी ६ ते दुपारी १२ पर्यंत जड वाहनांना माहमार्गावर बंद घालण्यात आली आहे, अशी माहिती राज्याचे वाहतूक अपर पोलीस महासंचालक डॉ. रविंद्र सिंगल यांनी दिली आहे.

### अवजड वाहनचालकांना आवाहन...

»सर्व जड अवजड वाहन मालक आणि चालक संघटना यांना वाहतूक पोलिसांनी आवाहन करण्यात आले आहे की, शनिवार, रविवार आणि सोमवार या तीन दिवशी मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे वाहिनीवरील प्रवास दुपारी १२ नंतर सुरू केल्यास आपला प्रवास सुरक्षित आणि सोयीस्कर होण्यास मदत होईल. तसेच वाहतूक कोंडी मुळे वाहनांचे क्लच प्लेट जाणे, इंजिनचे काम निघणे इत्यादी टळू शकेल. तसेच इंधन आणि वेळची बचत होणार असल्याचे देखील सांगण्यात आले आहे.

# नाट्य संमेलनासाठी २० लाखांचा निधी : उपमुख्यमंत्री अजित पवार!

## »पिंपरी-चिंचवडकर रसिकांसाठी पर्वणी

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी चिंचवड येथे होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून २० लाखाचा निधी देण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.**



यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, पुणे शाखेचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनासाठी शासनातर्फे १० कोटी रुपये देण्यात येणार आहे. या संमेलनासाठी आमदार निधीतून प्रस्ताव आल्यास मान्यता देण्यात येईल. नाट्य संमेलनासाठी मंडप अत्यंत उत्तम दर्जाचा असावा. नाट्य कलावंतांना आवश्यक सर्व सुविधा पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उपलब्ध करून द्याव्यात. सर्वांच्या स्मरणात राहील असे आयोजन करावे, अशी सूचना त्यांनी केली.

> "नाट्य संमेलनाला गौरवशाली परंपरा असून शंभरावे नाट्यसंमेलन पिंपरी चिंचवड औद्योगिक नगरीत होत आहे. नाट्य संमेलन हा केवळ सोहळा नसून ती एक चळवळ आहे. सांस्कृतिक क्षेत्राची परंपरा नाट्य संमेलनाने जपली आहे. ही परंपरा यशस्वीपणे पुढे नेण्यासाठी सर्वांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. 'न भूतो न भविष्यती' अशा स्वरूपात या नाट्य संमेलनाचे आयोजन करावे. नाट्य परिषद आणि शासनाकडून यासाठी आवश्यक सर्व सहकार्य केले जाईल.
>
> -उदय सामंत, उद्योगमंत्री.

# स्वारगेट ते कात्रज मेट्रो धावणार?

## केंद्राच्या मान्यतेची प्रतीक्षा; अजित पवार निधी देणार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**स्वारगेट ते कात्रज मेट्रोचे काम लवकर सुरू (PUNE METRO) करण्याचे नियोजन करावे, या मार्गाला केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यावर राज्य सरकारच्या हिश्श्यातील निधी त्वरित उपलब्ध करून देण्यात येईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. मेट्रो मार्ग आणि अहमदनगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते.**



अजित पवार म्हणाले, स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गासाठी केंद्र शासन स्तरावर आवश्यक मान्यतेसाठी पाठपुरावा करण्यात येईल. या मेट्रो मार्गावरील स्थानके अत्याधुनिक सुविधांनी युक्त करावी. रामवाडी येथून विमानतळापर्यंत मेट्रो लाईन सुविधा देण्याचा विचार व्हावा. अहमदनगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तेथील रस्ते आणि पुलांच्या कामांना गती द्यावी. संगमवाडी ते खराडी रस्त्याचे भूसंपादन करण्याची कार्यवाही लवकर करावी. नगररोड परिसरातील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी. पोलीस विभागाने या भागात वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. नगर रस्त्यावरील खड्डयांची दुरुस्ती करण्याची कार्यवाही तातडीने करावी. या मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्या, असेही आदेश त्यांनी दिले.

बैठकीत महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करताना स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गाच्या प्रगतीबाबत माहिती दिली. या मार्गाचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी पब्लिक इन्व्हेस्टमेंट बोर्डाकडे विचाराधीन आहे. लवकरच त्यास मान्यता मिळाल्यावर केंद्रीय मंत्रिमंडळाची त्याला मान्यता मिळेल, यानंतर या मार्गावरील काम सुरू करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. पुणे शहरातील स्वारगेट ते कात्रज भूमिगत मेट्रो प्रस्तावित आहे. या प्रस्तावाला मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवला जाईल, असे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत सांगितलं होतं.

स्वारगेट ते कात्रज मेट्रोचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे गेल्यानंतर राज्य शासन त्याचा पाठपुरावा करून मंजुरी घेईल. खडकवासला ते खडारी हा 25.65 किमीच्या मेट्रो मार्गाचा डीपीआर राज्य शासनाकडे सादर झालेला आहे. तो देखील मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन केंद्र शासनाकडे पाठवला जाईल.

या मेट्रोचे शेवटचे स्टेशन खडकवासला धरणापर्यंत असावे अशी मागणी केलेली आहे. त्याची देखील संयुक्त पाहणी झालेली आहे. तो प्रस्ताव फिजिबिलिटी रिपोर्टसह शासनाकडे सादर केलेला असून राज्य शासन त्यावर निर्णय घेईल, असे मंत्री सामंत यांनी यावेळी सांगितलं होतं. आता फक्त या मेट्रोसाठी केंद्राच्या मान्यतेची गरज आहे ती मान्यता मिळाली की मेट्रोचा मार्ग मोकळा असेल. अजित पवार म्हणाले, स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गासाठी केंद्र शासन स्तरावर आवश्यक मान्यतेसाठी पाठपुरावा करण्यात येईल. या मेट्रो मार्गावरील स्थानके अत्याधुनिक सुविधांनी युक्त करावी.

### पुलांच्या कामांना गती द्यावी

» रामवाडी येथून विमानतळापर्यंत मेट्रो लाईन सुविधा देण्याचा विचार व्हावा. अहमदनगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तेथील रस्ते आणि पुलांच्या कामांना गती द्यावी. संगमवाडी ते खराडी रस्त्याचे भूसंपादन करण्याची कार्यवाही लवकर करावी. नगररोड परिसरातील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी. पोलीस विभागाने या भागात वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. नगर रस्त्यावरील खड्डयांची दुरुस्ती करण्याची कार्यवाही तातडीने करावी. या मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्या, असेही आदेश त्यांनी दिले. बैठकीत महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करताना स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गाच्या प्रगतीबाबत माहिती दिली.

# सलग सुट्ट्यांमुळे द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी!

## एक्स्प्रेसवेवर बोरघाटात तब्बल 10 किमी वाहनांच्या रांगा

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**नाताळ सणाला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. लोणावळ्यात मोठ्या संख्येने मुंबईतील पर्यटक दाखल झाल्याने सकाळपासून द्रुतगती मार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. नाताळ सण सोमवारी (२५ डिसेंबर) आहे. शनिवार आणि रविवारला नाताळची सुट्टी जोडून आल्याने मोठ्या संख्येने मुंबई-पुण्यातील पर्यटकांनी सकाळपासून गर्दी केली होती.**

पुण्याकडे येणाऱ्या मार्गावर खालापूर टोलनाका आणि खंडाळा घाटात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. वाहतूकीचा वेग कमालीचा संथ झाला होता. त्यामुळे घाटात इंजिन गरम होऊन मोटारी बंद पडत होत्या. मोटारी बंद पडल्याने कोंडीत भर पडली. घाट क्षेत्रातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी बोरघाट महामार्ग पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान, तसेच अपघातग्रस्तांच्या मदतीला या संस्थेचे कार्यकर्ते प्रयत्न करत होते. खंडाळा बोगदा परिसरात मुंबईकडे जाणारी वाहने काही काळ थांबवून ठेवण्यात आली होती. मुंबईहून लोणावळ्याकडे येणाऱ्या मोटारींसाठी सर्व सहा मार्गिका खुल्या करुन देण्यात आल्या होत्या. मात्र, मोठ्या



संख्येने मोटारी द्रुतगती मार्गावर आल्याने वाहतूक नियोजन करणाऱ्या पोलिसांची धावपळ उडाली. मुंबई पुणे एक्स्प्रेसवेवर बोरघाटात तब्बल 10 किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. यामुळे अनेक ठिकाणी पुण्याच्या दिशेने होणारी वाहतूक (Traffic stopped while going to Pune) तुंबली आहे. अडोशी टनेलच्या अगोदरपासून अमृतांजन ब्रिजपर्यंत व पुण्याच्या दिशेला खंडाळाकडे 10 किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. मुंबई पुणे एक्स्प्रेसवेसह जुन्या मार्गावर खोपोली हद्दीत बोरघाटात शेकडो वाहने बंद आहेत. दुसरीकडे, बोरघाटात शेकडो संख्येने प्रवासी वाहने बंद आहेत. जुन्या मुंबई पुणे मार्गावर (Mumbai Pune Expressway) पुण्याकडे जाताना शिंग्रोबाच्या अगोदरपासून मोठ्या प्रमाणात वाहने बंद आहेत. मोठ्या संख्येने महिला, लहान मुले रस्त्यावर बसून आहेत. टोविंग वॅन, मेकॅनिकच्या प्रतीक्षेत शेकडो प्रवासी आहेत.

### सकाळपासून एक्स्प्रेसवेवर कोंडी

» शनिवार व रविवारला जोडून तसेच ख्रिसमस सुट्टी आल्याने सलग सुट्यांचा आनंद घेण्यासाठी मुंबईकर मोठ्या संख्येने घराबाहेर पडले आहेत. त्यामुळे आज सकाळपासून मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर वाहतूक कोंडी झाली आहे. पुण्याकडे येणाऱ्या मार्गावर खालापूर टोल नाका व खंडाळा घाटात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अतिशय संथ गतीने वाहने पुढे सरकत होती. खंडाळा घाटाचा परिसर चढणीचा असल्याने अनेक वाहने गरम होऊन बंद पडत आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी भर पडत आहे.

# लोकसभा निवडणुकीतही भाजपाच 'अजेय'!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचा विश्वास : वॉरिअर्स बैठकीत महाविजयाचा केला संकल्प

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय जनता पार्टी ही जगातील सर्वात अनुशासित असणारा राजकीय पक्ष असून, कोणत्याही निवडणुकीसाठी आम्ही सदैव तयार असतो. आगामी लोकसभेच्या निवडणुकीमध्येही भारतीय जनता पक्ष पूर्ण तयारीनिशी उतरणार असून, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतील. त्यासाठी तळागाळातील लोकांपर्यंत पक्षाचा विचार आणि कल्याणकारी योजना पोहोचवण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीतही भाजपा 'अजेय' राहील, असा विश्वास शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला.**




आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मावळ लोकसभा अंतर्गत भारतीय जनता पार्टीच्या वतीने वॉरिअर्स बैठक रहाटणी येथील थोपटे लॉन्स या ठिकाणी झाली. यावेळी पिंपरी आणि चिंचवड या दोन विधानसभा क्षेत्रातील वॉरिअर्सशी संवाद साधण्यात आला.

या बैठकीला प्रदेश महासचिव विक्रांत पाटील, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, बाळाभाऊ भेगडे, लोकसभा निवडणूक प्रमुख तथा आमदार प्रशांत ठाकूर, प्रदेश सचिव वर्षा डहाळे, रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, बाळासाहेब पाटील, राजेश पिल्ले, युवा मोर्च्याचे प्रदेश महामंत्री अनुप मोरे, चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप, भोसरीचे आमदार महेश लांडगे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, माजी महापौर माई ढोरे, पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, मावळ विधानसभा निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे, शहर वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, उपाध्यक्ष माऊली थोरात, शहर सरचिटणीस विलास मडीगेरी, नामदेव ढाके, शैला मोळक, संजय मंगोडेकर, अजय पाताडे, शीतल शिंदे, युवा मोर्च्याचे शहराध्यक्ष तुषार हिंगे, महिला मोर्च्याच्या अध्यक्षा सुजाता पालांडे, भाजपा कार्यकारिणी सदस्य संतोष कलाटे आदी उपस्थित होते.

शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, केंद्र सरकार आणि राज्य शासनाच्या योजना जास्तीत-जास्त नागरिकांपर्यंत कशा प्रकारे पोहचविता येतील? समाजातील शेवटच्या घटकालाही या योजनांचा लाभ कशा प्रकारे मिळू शकेल? यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. त्यामुळे "अजेय भारत... अजेय भाजपा.." याचा अनुभव पुन्हा एकदा येईल, असा विश्वासही जगताप यांनी व्यक्त केला.

> समाजातील सर्व घटकांतील नागरिकांना केंद्र सरकार आणि राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळावा. या उद्देशाने सध्या विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन केले आहे. या यात्रेच्या माध्यमातून जास्तीत-जास्त नागरिकांना या योजनांमध्ये सहभागी करून घेण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. त्याअनुरूप कार्य करण्याच्या उद्देशाने आजच्या बैठकीचे आयोजन केले होते. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक नेत्यांच्या नेतृत्वात आम्ही 'युवा वॉरिअर्स'ना केंद्र व राज्यातील महायुती सरकारच्या योजना, विकासकामे घराघरांत पोहोचवण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी शक्तिकेंद्र, बूथप्रमुख आणि पन्ना प्रमुख अशी यंत्रणा सक्षम करण्यात आली आहे.
>
> **- शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

# मोशी-प्राधिकरण पेठ ६ मधील नागरिकांसाठी 'ओपन स्पेस'

## सोसायटीधारकांच्या मागणीला यश : आमदार लांडगे यांचा 'पीएमआरडीए' कडे पाठपुरावा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोशी-प्राधिकरण पेठ क्रमांक ६ येथील स्थानिक नागरिकांच्या पायाभूत सोयी-सुविधांसाठी २० गुंठे जागा राखीव करण्याबाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्यता दिली असून, संबंधित जागेचे रेखांकन करण्याचे आदेश पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाला दिले आहेत.**




पेठ क्रमांक ६ व ९ मधील स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार, परिसरात मुलांच्या खेळण्यासाठी मैदान, ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्यान किंवा सुविधा पार्क उपलब्ध नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाने ३ ते ४ एकर जागेत पायाभूत सोयी-सुविधा विकसित करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला होता. तसेच, भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांनाही याकामी लक्ष घालण्याची विनंती केली होती. तसेच, या भागात असलेल्या दत्त मंदिरामध्ये येणाऱ्या भाविकांनीही या जागेत मूलभूत सुविधा विकसित करण्याची मागणी केली होती.

तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून पेठ क्रमांक ६ चा नकाशा १९९९ साली मंजूर झाला होता. त्यानंतर दि. ७ जून २०२१ रोजी नवनगर विकास प्राधिकराचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात विसर्जन झाले. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात याकडे दुर्लक्ष झाले.

जुलै- २०२२ मध्ये महायुतीची सत्ता राज्यात स्थापन झाल्यानंतर आमदार लांडगे यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कडे पाठपुरावा सुरू केला. त्यामुळे पेठ क्रमांक ६ मधील १.४५ हे. आर जागा पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ताब्यात देण्यात आली. नकाशाप्रमाणे रहिवाशी जागेस भूखंड क्रमांक १८४ आणि १८५ व खुली जागा क्रमांक ६ क्षेत्र ०.२० हे. आर. असे नकाशात बदल करुन रेखांकन करण्याचे आदेश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त राहुल महिवाल यांनी दिले आहेत. यामुळे सोसायटीधारकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. सेक्टर- ६ मधील जलवायू विहास सोयायटीचे किरीट पटेल, युनिटी एव्हुन्यू सोसायटीचे संजय पाटील, सेक्टर- ९ मधील प्रगती एम्पायर सोसायटीचे बाळासाहेब पोखरकर, आदित्य वुड्स सोसायटीचे अनिल सैनदाने यांच्यासह स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. तसेच, या ठिकाणी असलेल्या दत्तमंदिर येणाऱ्या भाविकांनीही आमदार लांडगे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

> परिसरात सुमारे १० हजार लोकवस्ती आहे. मात्र, प्राधिकरणात उद्यान, खेळासाठी मैदान किंवा ज्येष्ठ नागरिकांसाठी खुली जागा नाही. त्यामुळे या भागात 'ओपन स्पेस' असावी आणि पायाभूत सोयी-सुविधा मिळाव्यात, अशी मागणी होती. त्याला यश मिळाले आहे. याकामी पाठपुरावा केल्याबद्दल आमदार महेश लांडगे यांचे आभार व्यक्त करतो. या ठिकाणी असलेल्या दत्त मंदिरात नियमितपणे भाविक येत असतात. त्यांच्यासाठी मूलभूत सुविधा विकसित करावी, अशी अपेक्षा आहे.
>
> **-कौतिक पाटील,** रिद्धि-सिद्धी सोसायटी, सेक्टर- ६.

> आमच्या परिसरामध्ये गार्डन अथवा मुलांना खेळण्यासाठी क्रीडांगण नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाने सुविधा विकसित करावी, अशी सोसायटीधारकांची मागणी होती. त्यानुसार आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आणि संबंधित भूखंड 'ओपन स्पेस' म्हणून विकसित करण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केला. त्यामुळे सोसायटीधारकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.
>
> **- दीपक नाईक,** साई पार्क सोसायटी, सेक्टर- ९.

# देश श्रीमंत होतोय आणि लोक गरीब होताहेत...




**भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिक वाढीमध्ये १६ टक्क्यांहून अधिक योगदान” अशा बातम्या सध्या येत आहेत (‘लोकसत्ता’नेही तसे वृत्त २० डिसेंबर रोजी दिले होते). सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपीमध्ये आपण जगात पाचवी मोठी अर्थव्यवस्था बनल्याचा आनंद आणि अभिमान साजरा करताना आपण मुळीच थकत नाही, असे यातून दिसून येते.**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीही आपल्या वाढत्या दराची प्रशंसा करीत आहे. आपला जलद गतीने विकास होत आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. परंतु या विकासाची फळे सामान्य जनतेला चाखायला मिळत आहेत काय, हे पाहण्याचीही तेवढीच गरज आहे. खरे तर देशाचा विकास म्हणजे देशातील सर्व नागरिकांचा विकास होय. कारण देश म्हणजेच मुख्यत्वे करून देशातील सर्व नागरिकच होत. त्यासाठी देशाचा खरोखरच विकास होत आहे की नाही, हे पाहण्यासाठी आपण दरडोई वार्षिक उत्पन्नाचे प्रमाण काय आहे, हेही बघितले पाहिजे. याच उद्देशाने केंद्र सरकारच्या सांख्यिकी विभागाने २८ फेब्रुवारी २३ रोजी जारी केलेल्या पत्रकामधील आकड्यांच्या आधारावर पुढील विवेचन केलेले आहे. या पत्रकामध्ये आपले २०२१-२२ या वर्षात रु. २०३.२७ लाख कोटी एवढे उत्पन्न अनुमानित केल्याचे दिसून येते.



(जीडीपी- रु. २३४.७१ लाख कोटी) परंतु आपले दरडोई वार्षिक उत्पन्न होते फक्त रु. १४८५२४/- . ( जीडीपी- रु.१,७१,४९८/-.) सकल राष्ट्रीय उत्पादनात आपला जगात पाचवा क्रमांक असला तरी दरडोई उत्पन्नात मात्र आपण १९० देशांत १४० व्या क्रमांकावर आहोत. (संदर्भ- विकिपीडिया) दरडोई राष्ट्रीय उत्पन्नात जगातील १३९ देश आपल्या पुढे आहेत. लाजिरवाणी बाब म्हणजे श्रीलंका आणि बांगला देशही आपल्या पुढे आहेत. पाकिस्तान मात्र आपल्याही खाली आहे. आपली अर्थव्यवस्था कितीही मोठी असली तरी सामान्य माणसाचे आयुष्य दारिद्र्यातच जात आहे. जीडीपीच्या वाढत्या दराचा आपण उदो उदो करीत आहोत. परंतु दरडोई सकल राष्ट्रीय उत्पादनातही आपण १८७ देशांच्या यादीत १४५ व्या स्थानावर विराजमान आहोत. सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपी हे संपूर्ण देशाचे एकत्रितपणे मोजल्या जाते. आणि या पद्धतीने येणाऱ्या उत्पादन किंवा उत्पन्नाला एकूण लोकसंख्येच्या आकड्याने भागले की दरडोई जीडीपी किंवा उत्पन्न मिळते. यामध्ये अतिश्रीमंत आणि अतिगरीब यांचेही उत्पादन/उत्पन्न एकत्रितच मोजले जाते. त्यामुळे या आकड्यावरून गरिबांचे प्रत्यक्ष दरडोई उत्पन्न काय असेल, हे समजू शकत नाही. तरीही आपण दुसऱ्याच एका आकडेवारीवरून गरिबाचे दरडोई उत्पन्न शोधण्याचा प्रयत्न करूयात. यासाठी आपण वर्ल्ड इनइक्वॅलिटी रिपोर्ट २०२२ चा आधार घेणार आहोत. या अहवालावरून लोकसंख्येच्या सर्वात वरील एक टक्के लोकांचा राष्ट्रीय उत्पन्नात २१.७ टक्के एवढा मोठा वाटा आहे. आणि वरच्या १० टक्के लोकांचा वाटा हा ५७.१ टक्के आहे. त्याच वेळी तळातील ५० टक्के लोकांचा वाटा फक्त १३.१ टक्के आहे. आपण या टक्केवारीच्या आधारे वर उल्लेखित पत्रकामध्ये दिलेल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचे भाग केले तर आपल्या हाती खालील आकडे येतात. वरच्या १० टक्के लोकांचे एकूण उत्पन्न रु. ११५.८६ लाख कोटी एवढे येते (एकूण रु. २०३.२७ लाख कोटी पैकी). भारताची सध्याची एकूण लोकसंख्या १३६.९० कोटी एवढी असल्याचे गृहीत धरले तर या वरच्या १० टक्के लोकांचे दरडोई वार्षिक उत्पन्न रु. ८४७८४५/- एवढे येते. त्यातही सर्वोच्च एक टक्का लोकांचे म्हणजे एकूण १.३७ कोटी लोकांचे दरडोई वार्षिक उत्पन्न रु. ३२,२२,०३३/- एवढे येते. आता याच आधारावर तळातील ५० टक्के लोकांचे उत्पन्न पाहूयात. या ५० टक्के गरीब लोकांच्या वाट्याला एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या रु. २६.४२५ लाख कोटी एवढे उत्पन्न येते. त्यावरून एकूण लोकसंख्येपैकी ६८.४५ कोटी लोकांचे दरडोई वार्षिक उत्पन्न फक्त रु. ३८९०२/- एवढेच येते. भारतीय लोकांचे २०२१-२२ मधील सरासरी दरडोई उत्पन्न रु. १,४८,५२४/- एवढे येत असले तरी तळातील लोकांचे हेच उत्पन्न जेमतेम रु. ३८९०२ /- एवढेच येते. यावरून या तथाकथित वाढत्या जीडीपीचा फायदा तळातील लोकांपर्यंत कितीसा पोहोचत आहे, याचा देशातील संवेदनशील नागरिकांनी तरी विचार केला.

## संपादकीय »

### कलेचा दृष्टान्त


***फेक’ या इंग्रजी शब्दाला मराठीतही आता अढळपद मिळू लागले आहे.***

फेक’ या इंग्रजी शब्दाला मराठीतही आता अढळपद मिळू लागले आहे. मराठीत यापूर्वी चेंडू फेकला जायचा, दिवाळी-दसऱ्यापूर्वीच्या आवराआवरीत नकोशा वस्तू फेकून दिल्या जायच्या, नाटकात ‘संवादफेक’ असायची किंवा गायकांना कुणा उत्साही श्रोत्याकडून ‘काय आवाजाची फेक आहे..’ अशी दाद मिळायची. यापेक्षा निराळ्या आणि ‘खोटे- बनावट’ या अर्थाने इंग्रजीतला ‘फेक’ मराठीतही आला, ‘फेक न्यूज’चे दैनंदिन प्रमाण वाढू लागले, तसा तो इंग्रजी शब्दही मराठीत रुळला. गेल्या वर्षभरात तर कृत्रिम बुद्धिमत्तेचा- चॅटजीपीटी आदी उत्पादनांचा बोलबाला वाढला आणि ‘फेक’ची व्याप्ती किती मोठी असू शकते, याविषयीची चिंताही काही पटींनी वाढली. एखाद्या व्यक्तीचे छायाचित्र अथवा चलचित्र म्हणून प्रत्यक्ष दाखवले जाणारेही ‘फेक’ निघू लागले. संगणकीय करामतीने कुठलीही प्रतिमा कुठेही जोडता येऊ लागली. इथून पुढे ‘फेक’- बातम्या, छायाचित्रे, ध्वनि-चित्रमुद्रणे यांच्याबाबत सावधगिरी बाळगावीच लागणार.

**संसदेच्या दोन्ही सभागृहांतून अवघ्या काही दिवसांत १४० खासदारांच्या झालेल्या निलंबनाकडे निव्वळ राजकीय स्पर्धेच्या दृष्टिकोनातून- केवळ ‘कुरघोडीचे राजकारण’ म्हणून अद्यापही पाहिले जाते आहे. किंबहुना हे असे पाहिले जाणे, यातूनसुद्धा हेच अगदी स्पष्टपणे सिद्ध होते की, आपली संसदीय लोकशाही पार कोलमडते आहे.**

# मोदींचा दंडवत की अनियंत्रित सत्तेला कुर्निसात?

पण बहुतेकांना हे मान्य होणार नाही. हे नकारवादी लोक मग घटनात्मक व्यवस्थेच्या उरल्यासुरल्या सांगाड्याकडे ‘सकारात्मक बाबी’ म्हणून बोट दाखवतील. संसदीय कामकाजाचे शिरस्ते आणि रीतीभाती कशा पाळल्या जातात, संसदीय नियमावलीला कसे महत्त्व आहे, कायद्याप्रमाणे दाद मागता येते, सांविधानिक नीतिमत्तेची जाण असलेले लोक न्यायपालिकेत आहेत... असे या लोकांचे म्हणणे असते. पण या संस्थांच्या उरल्यासुरल्या अस्तित्वाकडे- किंबहुना त्या संस्थाच्या केवळ भाषेकडेच- बोट दाखवून संसदीय लोकशाही कशी काय जिवंत राहाणार आहे? जे काही घडते आहे, त्याला संसदीय लोकशाहीच्या भाषेचे अंगडेटोपडे घालून किंवा सांविधानकतेचे अस्तर लावून, आपण प्रत्यक्षात असांविधानिक सत्ता-केंद्रीकरणालाच बळ देतो आहोत, हे कधी लक्षात येणार आहे? सांविधानिक नीतिमत्तेबद्दल सरन्यायाधीश दररोज व्याख्याने देऊ शकतात, पण सर्वोच्च



न्यायालय त्या अपेक्षांना जागते आहे का? किंवा राज्यकर्ते व्याजोक्तीची (सोप्या शब्दांत, खोटेपणाची) लकेरही न दिसू देता ‘संसदीय शिस्त’ वगैरेवर बोलत राहू शकतात, पण संसद ही संस्था म्हणून मृतप्राय झाल्याचे वास्तव त्यातून बदलते का? प्रसारमाध्यमे सरकार आणि विरोधी पक्ष यांची ‘लडाई’, ‘जंग’, ‘हल्लाबोल’ वगैरे भाषा वापरतात, पण विरोधकांचा आवाजच दाबण्यासाठी सरकारने त्यांना कसे करकचून बांधले आहे, हे दिसण्याचे थांबते का? प्रसारमाध्यमे ही खरे तर जनमत घडवण्याची जागा. पण काही सन्माननीय अपवाद वगळता साऱ्याच ‘मीडिया’चे सत्तापूजन चालू आहेच, शिवाय सत्तेचे केंद्रीकरण आणखी वाढावे यासाठी हाकारे घालण्याचे कामही ‘मीडिया’ करतो आहे. फक्त निवडणुकांचा प्रचार प्राणपणाने केला जातो... पण निवडणुकांनंतर धोरणांचे कुठल्याही प्रकारचे मोजमाप होऊच नये, जबाबदारीची निश्चिती करताच येऊ नये, अशी मखलाशी केली जाते. सत्तेची विभागणी- विशेषत: लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांना ठरीव अधिकार, ही संकल्पना तर कधीच मोडीत निघाल्याचे दिसते आहे. केवळ आपल्याच नव्हे, ज्या देशांमध्ये ‘संसदीय लोकशाही’ आहे, तिथे कायदे करण्याचे आणि अमलबजावणीचे अधिकार यांची सरमिसळ केली जाताना दिसते आहे. ही प्रक्रिया आजची नव्हे. ती गेल्या कैक वर्षांपासून सुरू झाली आणि तिची मुळे ‘पक्षीय’ सरकार असण्यात शोधता येतात.अलीकडे भानु धामजिया यांनीही- ‘अध्यक्षीय पद्धती’चा पुरस्कार केलेला आहे... यातून काही नाही तरी, आपल्या आजच्या राजकारणाचे, राजकीय प्रक्रियांचे कुरूप तरी उघडे पडते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 20 जानेवारीला मुंबईत आमरण उपोषण

## मराठ्यांवर दबाव टाकणं सोप्पं नाही : जरांगे-पाटील

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बीडमध्ये मनोज जरांगे-पाटील यांची 'निर्णायक इशारा सभा' पार पडली. या सभेत जरांगे-पाटलांनी मोठी घोषणा केली आहे. मुंबईत २० जानेवारीला आमरण उपोषण करणार, असं जरांगे-पाटलांनी म्हटलं आहे. मराठ्यांवर दबाव टाकणं सोप्पं नाही, असा इशाराही जरांगे-पाटलांनी सरकारला दिला आहे. जरांगे-पाटील म्हणाले, "सरकारनं मराठ्यांना नोटीसा दिल्या आणि मुंबईत १८ जानेवारीपर्यंत १४४ कलम लागू केलं. त्यामुळे २० जानेवारीला मुंबईत आमरण उपोषण करण्यात येईल.**



मुंबईतील आझाद मैदानावर मी आमरण उपोषण करणार आणि मला भेटण्यासाठी मराठे येतील." "शांततेच्या आणि कायदेशीर मार्गानं आपण उपोषण करू. पण, कोण कुठं बसेल माहिती नाही. रोड मोकळी करून बसण्याची व्यवस्था करावी. नाहीतर आमच्या धोरणाने आम्ही बसू. मात्र, मराठ्यांनी मुंबईकडे कूच केली, तर विराट समुदाय माघारी फिरणार नाही. आरक्षण घेऊनच माघारी फिरू," असा इशारा जरांगे-पाटलांनी सरकारला दिला आहे. "आता आरक्षण घेतल्याशिवाय सुट्टी नाही. फक्त शांततेत सगळ्यांनी मुंबईकडे चला. शांततेची धूळ जरी उडाली, तरी सरकार मुंबईत राहणार नाही. सगळे आपल्या गावी येणार," असं जरांगे-पाटलांनी म्हटलं. बीडमध्ये मनोज जरांगे-पाटील यांची 'निर्णायक इशारा सभा' पार पडली. या सभेत जरांगे-पाटलांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर 'येवल्याचा येडपट' म्हणत हल्लाबोल केला. एकदा आरक्षण मिळूदे तुला हिसकाच दाखवतो. खूप दिवस झालं तुझी फडफड चालू आहे, असं एकेरी उल्लेख करत जरांगे-पाटलांनी भुजबळांवर हल्लाबोल केला आहे. जरांगे-पाटील म्हणाले, "कुणी म्हणत हॉटेल जाळलं, घरे जाळली. पण, शांततेत असलेल्या मराठ्यांवर खोटा डाग लावला गेला. यांनी यांचेच हॉटेल जाळले. निष्पाप तरूणांना गुंतवण्याचं काम सरकारनं केलं. मात्र, मराठ्यांना शांतता हवी आहे." "येवल्याच्या येडपाटानं बीडमधील पाहुण्याचं हॉटेल जाळलं. सरकारही भुजबळांचं ऐकत आहे. छगन भुजबळ आता 'जरांगे साहेब' म्हणत आहेत. भुजबळांना समज दिल्याचं गिरीश महाजनांनी सांगितलं. मी गप्प बसलो. नंतर मी म्हाताऱ्याला काहीही बोललो नाही. आता येडपट माझी शाळा काढत आहे. याला कुणी मंत्री केलं? हा महाराष्ट्राचा कलंक आहे," अशी टीका जरांगे-पाटलांनी छगन भुजबळांवर केली आहे. मराठा आरक्षणासाठी लढणाऱ्या मनोज जरांगे-पाटील यांची शनिवारी (२३ डिसेंबर) बीड येथे 'निर्णायक इशारा सभा' पार पडली. या सभेत मनोज जरांगे यांनी मोठी घोषणा केली आहे. मुंबईत २० जानेवारीला बेमुदत उपोषणाला बसणार असून माझ्याबरोबर हजारो मराठे तिथे येतील, अशी घोषणा जरांगे यांनी केली आहे. मनोज जरांगे म्हणाले, " राज्य सरकारने एका बाजूला मराठ्यांना नोटीसा पाठवल्या आणि दुसऱ्या बाजूला मुंबईत १८ जानेवारीपर्यंत १४४ कलम लागू केलं. त्यामुळे मी २० जानेवारीला मुंबईत बेमुदत उपोषणाला बसणार आहे. मुंबईच्या आझाद मैदानावर मी हे आंदोलन करेन. "सरकारनं शहाणपणाची भूमिका घ्यावी. त्या एकट्याचं ऐकून जर तुम्ही आमच्याविरोधात भूमिका घेऊन आरक्षणात आडकाठी आणणार असाल, तर शहाणे व्हा. मराठा समाजाला ताटकळत ठेऊ नका. नाहीतर शांततेत तुमचा सुफडा साफ केला जाईल," असा इशारा जरांगे-पाटलांनी सरकारला दिला आहे.

### कायदा-सुव्यवस्था राहिली पाहिजे

बीडमध्ये मनोज जरांगे-पाटील यांची 'निर्णायक इशारा सभा' पार पडली. या सभेत जरांगे-पाटलांनी मराठा आरक्षणाच्याबाबत मोठी घोषणा केली आहे. "२० जानेवारीपासून मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषण करणार," असं जरांगे-पाटलांनी म्हटलं आहे. या घोषणेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया व्यक्त करत "संयम बाळगावा," असं आवाहन जरांगे-पाटलांना केलं आहे. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, "सर्वोच्च न्यायालयानं मराठा आरक्षणाची क्युरेटिव्ह याचिका स्विकारली आहे. याप्रकरणी २४ जानेवारीला सुनावणी होणार आहे. आरक्षण मिळण्याच्या दृष्टीनं मराठा समाजासाठी हा फार मोठा दिलासादायक निर्णय आहे." "मराठा समाजाला मागास सिद्ध करण्यासाठी वकिलांची फौज सरकारची बाजू न्यायालयात मांडेल. यातून मराठा समाजाला न्याय मिळेल. तोपर्यंत सर्वांनी संयम राखणं महत्वाचं आहे. राज्यात कायदा-सुव्यवस्था राहिली पाहिजे. जाती-जातींमध्ये तेढ निर्माण होऊ नये. सर्वोच्च न्यायालयात आपण सर्व बाबी मांडू आणि मराठा समाजाला आरक्षण मिळवून देऊ," अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. आंदोलनकर्ते, विरोधी पक्ष आणि सरकारचं मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी एकमत आहे. आता क्युरेटिव्ह याचिकेवर २४ जानेवारीला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. त्यामुळे कुणीही घाईगडबडीनं निर्णय घेऊ नये. संयम बाळगावा," असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी जरांगे-पाटलांना केलं आहे.

# नाताळ, नववर्षासाठी पाचगणी, महाबळेश्वर पर्यटकांनी फुलले

## शुक्रवार सायंकाळपासूनच दोन्ही स्थळांवरच्या हॉटेल्स 'हाऊसफुल'

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज

**नववर्ष साजरे करण्यासाठी आलेल्या हजारो पर्यटकांनी महाराष्ट्राचे काश्मीर पाचगणी, महाबळेश्वर पर्यटकांनी फुलून गेले आहे. शुक्रवार सायंकाळपासूनच या दोन्ही पर्यटनस्थळांवरच्या राहण्याच्या सर्व जागा, हॉटेल्स 'हाऊसफुल' झालेल्या आहेत. महाबळेश्वरच्या प्रसिद्ध वेण्णा तलावापासून ते विविध पॉईंटसपर्यंत सर्व पर्यटनस्थळांवर पर्यटकांनी मोठी गर्दी केली आहे.**

आजपासून सुरू झालेली ही गर्दी पुढील आढवठाभर कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नाताळ सण, नववर्ष साजरे करण्यासाठी दरवर्षी हजारो पर्यटक महाराष्ट्राचे काश्मीर पाचगणी, महाबळेश्वरला पसंती देतात. यंदाही पर्यटकांनी मोठ्या संख्येने या पर्यनस्थळी आपला मोर्चा वळवला आहे. अनेक पर्यटकांनी महिनाभर अगोदरच 'ऑनलाइन' पद्धतीने लॉज, हॉटेल, रिसॉर्ट, बंगले आणि शेतघरांची नोंदणी केली आहे. 'एमटीडीसी' रिसॉर्टचे बुकिंग फुल झाले आहे. याशिवाय शेकडो पर्यटक ऐनवेळेसही पाचगणी, महाबळेश्वरकडे वळले आहेत. गेल्या काही वर्षांपासून अनेक पर्यटक आता पाचगणी, महाबळेश्वरच्या परिसरातील छोट्या मोठ्या गावांमध्येही राहतात. या पर्यटन सप्ताहानिमित्त बहुतेक सर्व हॉटेल, लॉजवर विद्युत रोषणाईसह सजावट करण्यात आली आहे. अनेकांनी आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजनही केले आहे. सोबतच काहींनी विशिष्ट प्रकारचे 'फूड फेस्टीवल'चे आयोजनही केलेले आहे. दरम्यान येथे आलेल्या पर्यटकांनी महाबळेश्वरमधील वेण्णालेक केटस पॉइंट, बॉम्बे पॉईंट, लॉडविक पॉईंट, विल्सन पॉईंट, पाचगणीमधील पारसी पॉईंट, सिडनी पॉईंट, टेबल लँड आदी पॉईंटस, प्रसिद्ध वेण्णा तलाव, पाचगणीचे विविध पॉईंटस, पठार, पुस्तकांचे गाव भिलार तसेच श्री क्षेत्र महाबळेश्वर फुलून गेले आहे. विविध पॉईंटसवरून पर्यटक निसर्गाचे रूप न्याहाळत आहेत. तर वेण्णा तलावात जलक्रिडेचा आनंद घेत आहेत. सध्या येथे नौकानयनासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. अशाच पद्धतीने अश्वारोहणासाठीही पर्यटक गर्दी करत आहेत. पाचगणी, महाबळेश्वरला जोडूनच अनेक पर्यटक वाई, भिलार, तापोळा, प्रतापगड, कास पठारकडे जात आहेत. दरम्यान, येथे आलेल्या पर्यटकांनी पाचगणी, महाबळेश्वरच्या बाजारपेठाही भरून गेल्या आहेत. येथील फुटाणे, काठी, चप्पल, ऊबदार कपडे, टोप्या, विविध सरबते, ग्रामीण वस्तू, मध, जंगली पदार्थ, रानमेवा, खेळणी यांनी महाबळेश्वरची बागजारपेठ सजली आहे. महाबळेश्वर पाचगणी येथील खाद्यपदार्थही पर्यटकांना नेहमीच भुरळ घालत असतात.

### विविध कार्यक्रमांचे आयोजन

या निमित्ताने परिसरातील विविध तीर्थक्षेत्रांवरही पर्यटक गर्दी करत आहेत. श्री क्षेत्र महाबळेश्वर, वाई – मेणवली येथील ऐतिहासिक मंदिरे, घाटांवरही पर्यटक येत आहेत. महाबळेश्वर आणि वाईत ब्रिटिशकालीन जुनी चर्चदेखील आहेत. या चर्चमध्येही नाताळनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मोठ्या संख्येने आलेल्या या पर्यटकांमुळे महाबळेश्वरकडे येणाऱ्या रस्त्यांवर वाहनांच्या मोठ्या रांगा लागलेल्या पाहण्यास मिळत आहेत. सध्या नगरपालिकेसह, पोलीस यंत्रणेला या वाहतुकीचे नियंत्रण आणि सुरळीत ठेवण्याचे मोठे काम करावे लागत आहे.

# तुम्हाला पंतप्रधान व्हायचंय!

## » वाराणसीतून निवडणूक लढण्याचे आव्हान

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

पश्चिम बंगालमधील भाजपा नेत्या अग्निमित्रा पॉल यांनी राज्याच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांना वाराणसी लोकसभा मतदारसंघातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात निवडणूक लढविण्याचे आव्हान दिले आहे. बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीच्या चौथ्या बैठकीत काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांना वाराणसी येथून निवडणूक लढविण्याचा सल्ला दिला होता, अशी माहिती तृणमूल काँग्रेसच्या सूत्रांनी इंडिया टुडेला दिली होती. ही माहिती बाहेर आल्यानंतर भाजपाच्या नेत्या अग्निमित्रा यांनी बॅनर्जी यांना हे आव्हान दिले.



“जागावाटपाची चर्चा होण्याआधी ममता बॅनर्जी यांनी प्रियांका गांधी यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात वाराणसी येथून निवडणूक लढविण्याचा सल्ला दिला. पण ममता बॅनर्जी यांनी स्वतः हे धाडस दाखवावे. तुम्हाला पंतप्रधान व्हायचे आहे. मग तुम्हीच पंतप्रधानांच्या विरोधात निवडणूक लढवावी. यातून तुमच्यात किती हिंमत आहे, हेही दिसून येईल”, असे आव्हान अग्निमित्रा यांनी दिले आहे. २०१९ साली झालेल्या निवडणुकीतही प्रियांका गांधी वाराणसी येथून पंतप्रधान मोदींच्या विरोधात निवडणूक लढवतील अशी जोरदार चर्चा होती. मात्र ऐनवेळी काँग्रेसचे नेते अजय राय यांना या मतदारसंघात उमेदवारी देण्यात आली. अग्निमित्र पॉल यांनी यावेळी इंडिया आघाडीमधील नेत्यांमधील राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील विसंगती लक्षात आणून दिली. त्या म्हणाल्या, पश्चिम बंगालमधील काँग्रेसचे नेते अंधीर रंजन चौधरी हे तृणमूल काँग्रेसवर कार्यकर्त्यांच्या हत्या केल्याचा आरोप केला होता. राज्याच्या स्थानिक निवडणुकीत काँग्रेस कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्या होत्या. दरम्यान ममता बॅनर्जी सोनिया गांधी यांच्यासमवेत दिल्लीत एकाच मंचावर येतात आणि आपापसात चांगली मैत्री असल्याचे दाखवून देतात. तृणमूल काँग्रेसशी हातमिळवणी करून लोकसभेच्या निवडणुका लढविताना अधीर रंजन चौधरी पीडिता कुटुंबियांना काय तोंड दाखविणार आहेत? असा प्रश्न अग्निमित्रा यांनी उपस्थित केला. इंडिया आघाडीची चौथी बैठक झाल्यानंतर जेव्हा ममता बॅनर्जी यांना प्रियांका गांधी यांच्या उमेदवारीबाबत प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा त्या म्हणाल्या की, बैठकीत काय चर्चा झाली, हे आम्ही आताच सर्व सांगू शकत नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, इंडिया आघाडीच्या बैठकीत ३१ डिसेंबर पूर्वी जागावाटपाचे सूत्र निश्चित करावे, अशी मागणी ममता बॅनर्जी यांनी केली आहे. अग्निमित्र पॉल यांनी यावेळी इंडिया आघाडीमधील नेत्यांमधील राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील विसंगती लक्षात आणून दिली. काँग्रेसचे नेते अंधीर रंजन चौधरी हे तृणमूल काँग्रेसवर कार्यकर्त्यांच्या हत्या केल्याचा आरोप केला होता. राज्याच्या स्थानिक निवडणुकीत काँग्रेस कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्या होत्या. दरम्यान ममता बॅनर्जी सोनिया गांधी यांच्यासमवेत दिल्लीत एकाच मंचावर येतात आणि आपापसात चांगली मैत्री असल्याचे दाखवून देतात.

### तुमच्यात किती हिंमत आहे

» जागावाटपाची चर्चा होण्याआधी ममता बॅनर्जी यांनी प्रियांका गांधी यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात वाराणसी येथून निवडणूक लढविण्याचा सल्ला दिला. पण ममता बॅनर्जी यांनी स्वतः हे धाडस दाखवावे. तुम्हाला पंतप्रधान व्हायचे आहे. मग तुम्हीच पंतप्रधानांच्या विरोधात निवडणूक लढवावी. यातून तुमच्यात किती हिंमत आहे, हेही दिसून येईल”, असे आव्हान अग्निमित्रा यांनी दिले आहे. २०१९ साली झालेल्या निवडणुकीतही प्रियांका गांधी वाराणसी येथून पंतप्रधान मोदींच्या विरोधात निवडणूक लढवतील अशी जोरदार चर्चा होती. मात्र ऐनवेळी काँग्रेसचे नेते अजय राय यांना या मतदारसंघात उमेदवारी देण्यात आली. अग्निमित्र पॉल यांनी यावेळी इंडिया आघाडीमधील नेत्यांमधील राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील विसंगती लक्षात आणून दिली. त्या म्हणाल्या, पश्चिम बंगालमधील काँग्रेसचे नेते अंधीर रंजन चौधरी हे तृणमूल काँग्रेसवर कार्यकर्त्यांच्या हत्या केल्याचा आरोप केला होता.

# सरकारच्या काळात सुरक्षेचे बारा वाजले

## » दहशतवादी हल्ल्यावरून शिवसेनेची टीका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

जम्मू काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात गुरुवारी (२१ डिसेंबर) भारतीय लष्कराच्या वाहनांवर दहशतवाद्यांनी हल्ला केला आहे. या हल्ल्यात पाच भारतीय जवान शहीद झाले आहेत. या दहशतवादी हल्ल्यावरून शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या ‘सामना’तून केंद्र सरकारवर जोरदार टीका करण्यात आली आहे. काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्याच्या वाढत्या घटना देशाला अस्वस्थ करीत आहेत व दिल्लीच्या राजकारणात राम उरलेला नाही.



वीर जवानांच्या कुटुंबांचा आक्रोश आणि भारतमातेची वेदना समजून घेणारा कुणी आहे का? कारण संसदेची जीभ छाटली आहे, अशा शब्दांत सामनाच्या अग्रलेखातून सरकारवर टीकास्र सोडलं आहे. मोदी-शहांच्या सरकारच्या काळात राष्ट्रीय सुरक्षेचे बारा वाजले आहेत. मात्र हे सरकार निवडणुकांच्या राजकारणात गुंतून पडलं आहे. आधी संसदेत घुसखोरी झाली आणि आता जम्मू-कश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी लष्करी वाहनांच्या ताफ्यावर हल्ला केला. त्यात पाच जवानांना हौतात्म्य प्राप्त झाले. संसदेत सरकारने १४६ खासदारांचा बळी घेतला. संसदेतील सुरक्षेची जबाबदारी कोणाची? असा प्रश्न विचारल्याने खासदारांचे सामुदायिक निलंबन झाले. लष्करी वाहनांवरील हल्ल्याची जबाबदारी कोणाची? असा प्रश्न उद्या कोणी विचारला तर त्यांनाही संसदेतून निलंबित केले जाईल. देशाची ही स्थिती अत्यंत गंभीर आहे, अशी चिंता ‘सामना’च्या अग्रलेखातून व्यक्त करण्यात आली आहे. यावर्षी जम्मू काश्मीरमधील राजौरी आणि पुंछ जिल्ह्यात २५ जवान शहीद झाले. काश्मीरमध्ये ३७० कलम हटले, पण तिथे स्थिरता नाही. काश्मीर हे आता केंद्रशासित राज्य बनवले आहे. त्यामुळे तेथील सांडलेल्या प्रत्येक रक्ताच्या थेंबाची जबाबदारी केंद्र सरकारची आहे, असंही अग्रलेखात नमूद केलं आहे. दिल्लीत दीडशे खासदारांना ‘शहीद’ केले, तर तिकडे काश्मीरात पाच जवानांना हौतात्म्य प्राप्त झाले. रक्तपाताचे व लोकशाहीपतनाचे हे प्रकार सुरू असताना मोदी व त्यांचे लोक अयोध्येत राममंदिर उद्घाटनाची तयारी करीत आहेत. रामाने अत्यंत कल्पकतेने रावणाचा पराभव केला व शेवटी त्यास मारले, हे राजकीय रामभक्तांनी विसरू नये. रामाने सत्याची कास धरली व आपल्या राजकीय शत्रूंचाही तो आदर करीत होता.

# सरकारी रुग्णालयांमध्ये बनावट औषधे!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

दिल्लीच्या सरकारी रुग्णालयांमध्ये गुणवत्ता मानक चाचण्यांमध्ये अयशस्वी ठरलेल्या आणि रुग्णांचे जीवन धोक्यात घालणाऱ्या कथित बनावट औषधांच्या पुरवठ्याची सीबीआयमार्फत चौकशी करण्यात यावी अशी शिफारस नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी शनिवारी केली. दिल्लीच्या राज निवासच्या अधिकाऱ्यांनी यासंबंधी माहिती दिली. ‘औषधे व प्रसाधन कायदा, १९४०’अंतर्गत नियम आणि वैधानिक तरतुदींनुसार या औषधांची सरकारी तसेच खासगी विश्लेषक आणि प्रयोगशाळांमध्ये चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये ती औषधे ‘मानक गुणवत्ते’ची नसल्याचे दिसून आले असे राज्यपालांनी मुख्य सचिवांना कळवले आहे. राज्यपालांच्या शिफारशीवर प्रतिक्रिया देताना दिल्लीचे आरोग्यमंत्री सौरभ भारद्वाज म्हणाले की पदभार स्वीकारल्यानंतर आपण औषधांच्या खरेदीची लेखातपासणी करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, आरोग्य सचिवांनी कोणतीही कार्यवाही केली नव्हती. या प्रकरणी प्रशासकीय आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन करावे अशी मागणीही भारद्वाज यांनी केली. ‘राज निवास’च्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की नायब राज्यपालांनी मुख्य सचिव नरेश कुमार यांना लिहिलेल्या पत्रामध्ये ही औषधे लाखो रुग्णांना दिली जात असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. या औषधांची खरेदी ‘दिल्ली आरोग्य सेवा’अंतर्गत ‘केंद्रीय खरेदी संस्थे’द्वारे करण्यात आली असून ती दिल्लीतील सरकारी रुग्णालयांना पुरवण्यात आली.

# 'नवरदेव'चा टिझर रिलीज

२०२३ वर्ष संपत आलंय. २०२३ मध्ये अनेक मराठी सिनेमांनी प्रेक्षकांचं प्रेम मिळवलं. त्यातील महत्वाचे सिनेमे म्हणजे वाळवी, बाईपण भारी देवा, वेड आणि काहीच दिवसांपुर्वी रिलीज झालेला झिम्मा 2. अशा अनेक सिनेमांनी लोकांचं प्रेम मिळवलंय. आता २०२४ मध्ये सुद्धा 'पंचक', 'ओले आले' या सिनेमांची लोकांना उत्सुकता आहे. अशातच नवीन वर्षातला आणखी एक सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तो म्हणजे नवरदेव. आज राष्ट्रीय कृषीदिनाच्या निमित्ताने 'नवरदेव'चा टिझर रिलीज झालाय. 'शेतकरी राजा आणि या राजाला न मिळणारी नवरी' या गंभीर प्रश्नावर प्रभावी भाष्य करणारा 'नवरदेव (BSC AGRI.)' हा चित्रपटाची सर्वांना उत्सुकता आहे. आज राष्ट्रीय कृषीदिनाच्या निमित्ताने या चित्रपटाचा टीजर रिलीज करण्यात आला. हा टिझर हसता हसता गंभीर विषयाकडे बोट ठेवतो. आपला अन्नदाता म्हणजेच शेतकरी, तंत्रज्ञानाने कितीही विकसित झाला, कितीही प्रगत शेती केली, तरीही आज त्याला लग्नासाठी मुलगी मिळणं अवघड झालंय. दिग्दर्शक राम खाटमोडे यांनी अगदी योग्य पद्धतीने या विषयावर भाष्य करत हा विषय किती महत्त्वाचा आहे हे दाखवून दिले आहे. शेतीचं उत्तम शिक्षण घेतलेल्या महत्त्वाकांक्षी तरूणालाही लग्नासाठी कोणकोणत्या गोष्टींना सामोरं जावं लागतं याची कथा या चित्रपटातून आपल्याला बघायला मिळणार आहे. क्षितीश दाते, प्रविण तरडे, प्रियदर्शिनी इंदलकर, मकरंद अनासपुरे, गार्गी फुले, रमेश परदेशी, हार्दिक जोशी, नेहा शितोळे, संदीप पाठक अशा उत्तम कलाकारांची मांदियाळी या चित्रपटात आपल्याला दिसेल.

# सुनील शेट्टीचा मुलगा अहानचं ब्रेकअप!

सुनील शेट्टीचा मुलगा आणि अभिनेता अहान शेट्टी सध्या चर्चेत आहे. अहानचे 11 वर्षे जुने रिलेशनशीप तुटल्याची बातमी समोर आलीय. बातम्यांनुसार, अहानने त्याची अनेक वर्षांपासूनची गर्लफ्रेंड तानिया श्रॉफसोबत ब्रेकअप केले आहे. काय घडलं नेमकं जाणून घ्या. दोघेही 11 वर्षांपासून एकमेकांसोबत रिलेशनशिपमध्ये होते. अहान आणि तानिया लहानपणापासून एकत्र शिकले आणि नंतर एकमेकांच्या प्रेमात पडले. अगदी शाळेपासून या दोघांची लव्हस्टोरी आहे. पण आता हे जोडपे वेगळे झाल्याचे बोलले जात आहे. अहान आणि तानिया यांच्या ब्रेकअपचे कोणतेही कारण अद्याप समोर आलेले नाही. त्याचबरोबर अहान आणि तानियाकडूनही या बातमीवर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. पण दोघांनीही बऱ्याच दिवसांपासून एकमेकांसोबतची एकही पोस्ट शेअर केलेली नाही. याशिवाय कोणत्याही पार्टी, इव्हेंटमध्ये अहान - तानिया एकत्र दिसले नाहीत. तरीही दोघांच्या ब्रेकअपचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. अहानने जिच्यासोबत ब्रेकअप केलं ती तानिया श्रॉफ प्रसिद्ध मॉडेल असून उद्योगपती जयदेव आणि रोमिला श्रॉफ यांची मुलगी आहे. ती नामांकित उद्योगपतींच्या कुटुंबातील आहे. अहानबद्दल बोलायचे झाले तर, त्याने अभिनय क्षेत्रात पदार्पण केले आहे. तो तारा सुतारियासोबत 'तडप' चित्रपटात दिसला होता.

# गौतमी करणार लग्न!



गौतमी देशपांडे ही सोशल मीडियावर कमालीची सक्रीय असते. माझा होशील ना मालिकेतून गौतमी घराघरात लोकप्रिय झाली. गौतमीने नुकतीच तिच्या चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे. गौतमी लग्न करत आहे. गौतमीने सोशल मीडियावर मेहंदीचे खास फोटो शेअर करत सर्वांना ही गुड न्यूज दिलीय. कोण आहे गौतमीचा होणारा नवरा? जाणून घ्या. गौतमीने नुकतेच तिच्या सोशल मीडियावर मेहंदीचे फोटो शेअर केलेत. गौतमीने हे फोटो शेअर करताना लिहिलंय की, माझ्या सिक्रेट सांताचं आगमन थोडं लवकर झालंय. खुप आनंद आणि प्रेम असं कॅप्शन देत गौतमीने ही खास बातमी शेअर केलीय. गौतमी देशपांडे तिचा बॉयफ्रेंड स्वानंद तेंडूलकर सोबत लग्न करणार आहे. स्वानंद हा एक इनफ्लुएन्सर आणि सोशल मीडिया स्टार आहे. स्वानंद भाडिपा या प्रसिद्ध युट्यूब चॅनलमध्ये सक्रिय आहे. स्वानंद एक डिजीटल क्रिएटर असून त्याचे अनेक रिल्स व्हिडीओ व्हायरल होत असतात. गौतमी - स्वानंदच्या चाहत्यांनी त्यांचं कमेंट्सच्या माध्यमातून अभिनंदन केलंय. गौतमीने नुकतेच तिच्या सोशल मीडियावर मेहंदीचे फोटो शेअर केलेत. गौतमीने हे फोटो शेअर करताना लिहिलंय की, माझ्या सिक्रेट सांताचं आगमन थोडं लवकर झालंय. खुप आनंद आणि प्रेम असं कॅप्शन देत गौतमीने ही खास बातमी शेअर केलीय.

# धनखड अन् सलमान खानचं कनेक्शन काय?



यंदाचे संसदेच्या हिवाळी अधिवेशन चांगलेच चर्चेत आहे. खासदारांच्या निलंबणामुळे, संसदेतील झालेल्या घुसखोरीमुळे अन् जगदीप धनखड यांच्या मिमिक्रीमुळे. तर मिमिक्री केल्यामुळे उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे उपसभापती जगदीप धनखड हे चर्चेत आले आहेत. निलंबीत खासदार संसद परिसरात आंदोलन करत असताना टीएमसी खासदार कल्याण बॅनर्जी यांनी राज्यसभा सभापती जगदीप धनकड यांची नक्कल केली. टीएमसी खासदारांनी नक्कल केल्यानं उपराष्ट्रपती जगदीप धनखड चांगलेच संतापले आणि त्यांनी हा 'जाट समाजाचा' अपमान असल्याचे म्हटले. थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील या प्रकरणी प्रतिक्रिया दिली होती. यामुळे राजकीय वातावरण तर तापलचं मात्र जगदीप धनखड देखील चर्चेत आले. आता उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे उपसभापती जगदीप धनखड यांच्याबाबत काही रंजक गोष्टी आम्ही माहित आहेत का? जगदीप धनकड यांचा जन्म जयपूरच्या जाट कुटुंबात झाला. वकील म्हणून जगदीप धनखड यांनी राजस्थानमध्ये जाट यांनी आरक्षण देण्याची कायदेशीर लढाई लढली आणि ती जिंकली देखील. इतकच नाही तर जनसत्ताने दिलेल्या वृत्तानुसार, जगदीप धनखड हे बॉलिवूडचा भाईजान सलमान खान अन् किंग खान शाहरुख खानचे देखील वकील होते. सलमान खानची महत्वाची केस त्यांनी लढली होता 1998 मध्ये राजस्थानमध्ये सलमान खानने हम साथ साथ है या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान काळवीटाची शिकार केली होती. त्यानंतर त्याच्यावरील आरोप न्यायालयात सिद्ध झाल्यानंतर सलमानला 6 दिवस जोधपूर तुरुंगात घालवावे लागले होते. जोधपूर जिल्हा आणि सत्र न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी ज्येष्ठ वकील जगदीप धनखड हे सलमानचे वकील होते. जगदीप धनखड यांनी जिल्हा न्यायालयातून सलमानला जामीनही मिळवून दिला होता. 17 ऑक्टोबरला तो तुरुंगातून बाहेर आला. त्यानंतर हा खटला सुरूच राहिला आणि 2018 साली सलमान खानला जोधपूर येथील कनिष्ठ न्यायालयाने दोषी ठरविले आले आणि त्याला पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली.

# फायटर'साठी हृतिकने घेतलंय तगडं मानधन




'फायटर' (FIGHTER) हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तगडी स्टारकास्ट असलेला हा सिनेमा रिलीजआधीपासूनच चर्चेत आहे. सिनेमातील कलाकारांचे पोस्टर आऊट झाल्याने प्रेक्षकांची सिनेमाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. 'फायटर' हा सिनेमा 25 जानेवारी 2024 रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. काही दिवसांपूर्वी या सिनेमाचा टीझर आऊट झाला असून या टीझरमुळे प्रेक्षक सिनेमाची प्रतीक्षा करत आहेत. या सिनेमातील दोन गाणीदेखील प्रेक्षकांच्या भेटीला आली आहेत. 'फायटर' या सिनेमात हृतिक रोशन, दीपिका पादुकोण, अनिल कपूर, करण सिंह ग्रोवर आणि अक्षय ओबेरॉय हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. 'फायटर' या सिनेमासाठी सर्वच कलाकारांनी चांगलं मानधन घेतलं आहे. हृतिक रोशन (HRITHIK ROSHAN) : 'फायटर' या सिनेमात हृतिक रोशन मुख्य भूमिकेत आहे. या सिनेमाची प्रेक्षक गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षा करत असून या बहुचर्चित सिनेमासाठी त्याने 50 कोटी रुपयांचं मानधन घेतलं आहे. दीपिका पादुकोण (DEEPIKA PADUKONE) : 'फायटर' या सिनेमात दीपिका पादुकोणचा जबरदस्त अंदाज पाहायला मिळाला आहे. टीझरमधील गाण्यांनी प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं आहे. दीपिका पादुकोणने या सिनेमासाठी 15 कोटी रुपये चार्ज केले आहेत. अनिल कपूर (ANIL KAPOOR) : 'फायटर' या सिनेमात अनिल कपूर महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. या सिनेमासाठी त्यांनी 7 कोटी रुपये चार्ज केले आहेत. करण सिंह ग्रोवर (KARAN SINGH GROVER) : करण सिंह ग्रोवरने 'फायटर'साठी 2 कोटी रुपये चार्ज केले आहेत. या सिनेमात ते वैमानिकेच्या भूमिकेत दिसणार आहे. अक्षय ओबेरॉय : 'फायटर' या सिनेमात वैमानिकेच्या भूमिकेत दिसणाऱ्या अक्षय ओबेरॉयने 1 कोटी रुपयांचं मानधन घेतलं आहे.

# सूर्यकुमार मालिकेतून बाहेर पडला

## » सूर्याला तंदुरुस्त होण्यासाठी सहा आठवडे लागू शकतात

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**विश्वचषकानंतर ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-20 मालिकेत टीम इंडियाची धुरा सांभाळणारा सूर्यकुमार यादव भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील आगामी टी-20 मालिकेतून बाहेर पडला आहे. मीडिया रिपोर्ट्समध्ये हा दावा करण्यात आला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-20 मालिकेतील शेवटच्या सामन्यात चेंडू थांबवताना सूर्याला दुखापत झाली होती. या कारणामुळे तो किमान 7 आठवडे क्रिकेटपासून दूर राहणार आहे.**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-20 मालिकेतील शेवटच्या सामन्यात चेंडू रोखण्याच्या प्रयत्नात सूर्यकुमार यादवला ही दुखापत झाली. यामुळे तो क्षेत्ररक्षण करताना मैदानाबाहेर गेला. क्षेत्ररक्षण करताना सुरुवातीच्या षटकात सूर्याला दुखापत झाली होती. संघातील सदस्यांच्या खांद्यावर स्वार होऊन मैदान सोडले, त्यानंतर रवींद्र जडेजाने सामन्यात कर्णधारपदाची धुरा सांभाळली. सूर्याने सामन्यानंतर आपण ठीक असल्याचे सांगितले होते, मात्र आता आलेल्या बातमीने चाहत्यांचे टेन्शन वाढले आहे. एकदिवसीय विश्वचषक 2023 नंतर सूर्या भारतीय टी-20 संघाचे नेतृत्व करत होता. ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका जिंकून दक्षिण आफ्रिकेविरुद्धची मालिका 1-1 अशी बरोबरीत सोडवली. हार्दिक दुखापतग्रस्त असताना त्याला T20 मध्ये कर्णधारपद मिळाले. हार्दिकही बराच काळ बाहेर आहे. 'इंडियन एक्स्प्रेस'च्या रिपोर्टमध्ये सूर्याच्या घोट्यात ग्रेड टू टीअर असल्याचा दावा करण्यात आला आहे. दक्षिण आफ्रिकेतून परतल्यानंतर त्याचे स्कॅन करण्यात आले. यातून दुखापतीचे गांभीर्य लक्षात आले. आता तो किमान महिनाभर तरी खेळू शकणार नाही हे कळले. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यातच सूर्या बरा होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत तो भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन टी-20 मालिकेतून बाहेर पडेल. त्याला बरे होण्यासाठी वेळ लागेल, असा दावाही अहवालात करण्यात आला आहे. भारताचा 'मिस्टर 360 डिग्री' राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत पुनर्वसनासाठी जाणार आहे, त्यामुळे तो अफगाणिस्तान मालिकेतून बाहेर





पडणार हे निश्चित मानले जात आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेत सूर्या खेळला नाही, तर भारताचा कर्णधार कोण असेल, हे पाहणे बाकी आहे. हार्दिक बाद झाल्याने रोहित शर्माला खेळणे कठीण आहे. या मालिकेपासून तो आणि विराट कोहलीही दूर राहणार असल्याच्या बातम्या त्याच्याबाबतीत होत्या. अशा स्थितीत दक्षिण आफ्रिका दौऱ्यानंतर तो थेट इंग्लंड कसोटी मालिकेत दिसणार आहे. अशा परिस्थितीत टीम इंडियाचा नवा कर्णधार कोण असेल हा मोठा प्रश्न आहे. भारतीय संघाचा मधल्या फळीतील फलंदाज सूर्यकुमार यादव घोट्याच्या दुखापतीमुळे बराच काळ टीम इंडियातून बाहेर आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत त्याला ही दुखापत झाली होती. सूर्याने त्याच्या दुखापतीचा एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तो पायाला प्लास्टर घातलेला दिसत आहे. याबरोबरच तो वॉकरच्या साहाय्याने चालताना दिसत आहे. हा व्हिडीओ शेअर करण्याबरोबरच त्याने लिहिले की, तो लवकरच पूर्णपणे तंदुरुस्त होऊन परतणार आहे. व्हिडीओ शेअर करताना सूर्यकुमार यादवने लिहिले की, "गंभीरपणे एक गोष्ट मी सांगू इच्छितो की, दुखापती कधीच कोणाला होऊ नयेत. ही दुखापत मी माझ्या पद्धतीने हाताळेन आणि लवकरच पूर्णपणे तंदुरुस्त होण्याचे वचन माझ्या चाहत्यांना देतो. तोपर्यंत मला आशा आहे की तुम्ही सर्वजण सुट्टीचा आनंद लुटत आहात आणि दररोज छोट्या छोट्या गोष्टींचा आनंद घेत राहा." सूर्यकुमारने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये वेलकम चित्रपटातील एक डायलॉगही वाजत आहे. "माझा एक पाय कृत्रिम आहे, मी मोठा हॉकीपटू होतो, पण मी उदयभाईंना चिडवले..." असे या संवादात म्हटले आहे. नुकत्याच संपलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत सूर्यकुमार यादवला ही दुखापत झाली होती. या घोट्याच्या दुखापतीमुळे तो अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेत खेळू शकणार नाही. अफगाणिस्तानविरुद्धची टी-२० मालिका ११ जानेवारीपासून सुरू होणार आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, सूर्या आता फेब्रुवारीमध्ये क्रिकेटमध्ये पुनरागमन करू शकतो. बीसीसीआयच्या सूत्राने सांगितले की, ३१ वर्षीय सूर्या पुनर्वसनासाठी एनसीएमध्ये दाखल होणार आहे. आयपीएलपूर्वी फिटनेस तपासण्यासाठी तो फेब्रुवारीमध्ये रणजी ट्रॉफीमध्ये मुंबईकडून खेळू शकतो. एनसीएच्या वैद्यकीय विज्ञान पथकाने म्हटले आहे की त्याला बरे होण्यासाठी सहा आठवडे लागू शकतात. अशा परिस्थितीत तो अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेसाठी तंदुरुस्त होण्याची शक्यता कमी आहे.

### नवा T20 कर्णधार कोण असेल?

» टी-20 मालिकेतील शेवटच्या सामन्यात चेंडू थांबवताना सूर्याला दुखापत झाली होती. अफगाणिस्तानविरुद्धची टी-२० मालिका तीन आठवड्यांनी सुरू होणार आहे. हार्दिक पंड्याही या मालिकेसाठी फिट नाही. अशा परिस्थितीत रोहित शर्माचे टी-२० संघात पुनरागमन होऊ शकते. तसे न झाल्यास रवींद्र जडेजा किंवा जसप्रीत बुमराह अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेत कर्णधार होऊ शकतात. भारतीय अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्याला २०२३च्या विश्वचषकादरम्यान घोट्याला दुखापत झाली होती, त्यानंतर तो क्रिकेटपासून दूर आहे. हार्दिकने घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्धची टी-२० मालिका आणि डिसेंबरमध्ये दक्षिण आफ्रिका दौऱ्याला मुकावे लागले. जानेवारीच्या सुरुवातीला अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी तो बरा होईल, अशी अपेक्षा होती. पीटीआयच्या अहवालात असे सुचवले आहे की भारत पुन्हा एकदा अष्टपैलू खेळाडूशिवाय खेळू शकतो. तसेच, असे मानले जात आहे की तो आयपीएल २०२४ मधून देखील बाहेर होऊ शकतो.

# संजू सॅमसनचे लाखो चाहते का आहेत : दिनेश कार्तिक

## » कर्णधार के.एल. राहुलबरोबर चांगली भागीदारी केली

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय फलंदाज संजू सॅमसनने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यात पहिले शतक झळकावले, ज्यामुळे मेन इन ब्लूला दक्षिण आफ्रिकाविरुद्ध मालिका जिंकण्यात मदत झाली. बोलँड पार्कवर फलंदाजी करताना सॅमसनने ११४ चेंडूत १०८ धावा करत टीम इंडियाला २९६ धावांपर्यंत नेले.**

प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेचा






संघ २१८ धावांत सर्वबाद झाला आणि भारताने हा सामना ७८ धावांनी जिंकून मालिका २-१ अशी खिशात घातली. संजूच्या या कामगिरीनंतर दिनेश कार्तिकने त्याचे खूप कौतुक केले आहे. दिनेश काय म्हणाला, ते जाणून घेऊया. दिनेश कार्तिकने मालिका जिंकल्यानंतर संजू सॅमसनचे कौतुक केले आणि म्हटले की, फलंदाजाने दाखवून दिले की त्याचे इतके डाय-हार्ड चाहते का आहेत. क्रिकबझवर दिनेश म्हणाला, "सॅमसन अनेक वर्षांपासून संघाचा भाग आहे. संपूर्ण जग त्यांच्याबद्दल चांगले बोलते आणि त्याचे लाखो समर्थक आहेत. तो त्यांच्यावर प्रेम करतो आणि ते त्याचे कौतुक करतात. त्याचा इतका निष्ठावान चाहता वर्ग का आहे हे त्यांनी दाखवून दिले. संपूर्ण जग त्याचे आता चाहता वर्ग झाला आहे." दिनेश कार्तिक पुढे म्हणाला, "शेवटच्या सामन्यात त्याने क्रमांक तीन वर फलंदाजी केली, ती त्याची आवडती फलंदाजी करण्याची जागा आहे. त्याने कर्णधार के.एल. राहुलबरोबर चांगली भागीदारी केली. कर्णधार बाद झाल्यावर सॅमसनने भारताला आघाडीवर ठेवण्यासाठी तिलक वर्माला हाताशी घेत संघाला मोठी धावसंख्या उभारण्यात मदत केली. त्याच्या डाव सावरण्याच्या योजनेला सर्वांनी १०० पैकी १०० गुण दिले आहेत." कार्तिक पुढे म्हणाला की, "उल्लेखनीय बाब अशी आहे आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात तिलक वर्माने ७७ चेंडूत ५२ धावा केल्या होत्या. सॅमसन आणि तिलक यांनी ११६ धावा जोडल्या आणि शेवटच्या ६-७ षटकात ६० धावा झाल्या. सॅमसनने त्याच्या डावात लवकर जोखीम घेतली नाही कारण त्याला माहित होते की तो सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात धावसंख्या वाढवू शकतो.

### 100 पैकी 100 गुण दिले

» टी-२० आणि एकदिवसीय मालिकेनंतर भारतीय संघ कसोटी सामने खेळण्यासाठी आला होता, त्यातील अर्ध्याहून अधिक खेळाडू दीर्घ कालावधीनंतर संघात परतत आहेत. अशा परिस्थितीत, त्या खेळाडूंना सराव देण्यासाठी बीसीसीआयने वरिष्ठ संघ आणि भारत-अ खेळाडूंमध्ये सराव सामना आयोजित केला आहे.

MahaENews

The fight for truth... the right to democracy!

www.mahaenews.com | SUNDAY, 24th DECEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# BJP will remain invincible even in forthcoming Lok Sabha elections

## »BJP city president Shankar Jagtap speaks out his confidence

## Mahavijaya' i.e. a huge victory was resolved in the 'Warriors meet'!




**Pimpri : Representative**

**Bharatiya Janata Party is the most disciplined political party in the world and we are always ready for any election. Bharatiya Janata Party will be fully equipped for the upcoming Lok Sabha elections and Prime Minister Narendra Modi will take oath as Prime Minister for consequently for the third time. We are working to convey the party's thoughts and to take all welfare schemes to the people at the ground most level of the society to achieve our goal.' With these words, City President Shankar Jagtap expressed the confidence that BJP will remain 'invincible' in the upcoming Lok Sabha elections as well.**

In view of the upcoming Lok Sabha elections, a special 'Warriors meeting' was held on behalf of the Bharatiya Janata Party under the Maval assembly at Thopete Lawns in Rahatni. And an interaction was held with the warriors of two assembly zones namely Pimpri and Chinchwad.

State General Secretary Vikrant Patil, State Vice President Amar Sable, Balabhau Bhegde, Lok Sabha Election Chief and MLA Prashant Thakur, State Secretary Varsha Dahale, Raigad District President Avinash Koli, BJP State Executive Member Sadashiv Khade, Balasaheb Patil, Rajesh Pillay, State General Secretary of Yuva Morcha were present in this meeting.

Anup More, Chinchwad MLA Ashwini Jagtap, Bhosari MLA Mahesh Landge, Legislative Council MLA Uma Khapare, Former Mayor Mai Dhore, Pimpri Assembly Election Chief Amit Gorkhe, Chinchwad Assembly Election Chief Kaluram Barne, Maval Assembly Election Chief Ravindra Bhegde, City Senior Vice President and Spokesperson Raju Durge, Vice President Mauli Thorat, City General Secretary Vilas Madigeri, Namdev Dhaka, Shaila Molak, Sanjay Mangodekar, Ajay Patade, Sheetal Shinde, Yuva Morcha City President Tushar Hinge, Mahila Morcha President Sujata Palande, BJP executive member Santosh Kalate etc were present for this important meet



"Citizens from all sections of the society should get the benefit of all the schemes of the central government and the state government. Currently developed Bharat Sankalp Yatra has been organized for the said purpose. Through this yatra, we aim to involve as many citizens as possible in these schemes. Today's meeting was organized with the aim of working accordingly. Under the guidance of State President Chandrasekhar Bawankule, Deputy Chief Minister Devendra Fadnavis and the leadership of local leaders, we have resolved to take all schemes of Central government and of the grand alliance state government and also their development works to every home through our "Young Warriors". The system of Shaktikendra, Booth Pramukh and Panna Pramukh has been enabled to accomplish this target.

**- Shankar Jagtap,** City President, BJP, Pimpri-Chinchwad.

City president Shankar Jagtap guided about how the schemes of the central government and the state government be reached to the maximum number of citizens; how can even the last segment of the society benefit from these schemes. It was resolved to strive for this at this meet. Jagtap also expressed his confidence that the nation will experience "Invincible India... Invincible BJP..." once again.

# Traffic Chaos on Mumbai-Pune Expressway as Christmas Tourists Flood Lonavala

**Lonavala :** The Mumbai-Pune Expressway witnessed significant disruptions in traffic flow as a surge of Christmas holidaymakers from Mumbai flocked to Lonavala, causing extensive queues on the expressway throughout the day.



With Christmas falling on Monday (December 25), a considerable influx of tourists from both Mumbai and Pune started pouring in early morning, taking advantage of the extended holiday weekend. The traffic congestion was particularly notable at the Khalapur toll plaza and Khandala Ghat on the way to Pune. The sluggish pace of traffic led to engines overheating and several cars experiencing shutdowns.

The halted vehicles added to the complexity of the situation. Authorities, including Borghat Highway Police, Maharashtra Security Force personnel, and their dedicated workers, made efforts to assist stranded motorists and alleviate traffic woes in the Ghat region.

For a brief period, Mumbai-bound vehicles were held up in the Khandala tunnel area. Meanwhile, all six lanes were open for vehicles heading from Mumbai to Lonavala.

Despite these measures, the surge of cars on the expressway overwhelmed traffic management plans, requiring quick adjustments from the traffic planning police. The situation highlighted the challenges posed by the holiday rush on major transit routes during festive seasons.